# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सूचना

विषय :- स्थापत्य आणि यांत्रिकी व विद्युत अभियांत्रिकी कामाकरिता कंत्राटदारांच्या नोंदणीबाबतची नियमावली सन **२०१६.**

महानगरपालिकेतील अभियांत्रिकी कामे पार पाडण्यासाठी कंत्राटदारांच्या नोंदणीबाबतच्या प्रचलित नियमावलीमध्ये सुधारणा करण्यात आलेली असून २०१६ ची नवीन नियमावली ``स्थापत्य आणि यांत्रिकी व विद्युत अभियांत्रिकी कामाकरिता कंत्राटदारांच्या नोंदणीबाबतची नियमावली सन २०१६`` या नावाने दिनांक ०१/१२/२०१६ पासून लागू करण्यात आलेली आहे, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अतएव, यापुढे नवीन नियमावली २०१६ अनुसारच कंत्राटदारांची नोंदणी केली जाईल.

नोंदणीबाबतच्या नवीन नियमावलीची पुस्तिका व विहित नमुन्यातील अर्ज यासाठीचे निर्धारीत शुल्क, म्हणजे प्रत्येकी रू. १००० /- अधिक व्हॅट भरल्यानंतर दिनांक ०५/१२/२०१६ पासून कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणी) कक्ष या कार्यालयात उपलब्ध होतील.

सद्य स्थितीत मुंबई महानगरपालिकेत काही कंत्राटदार सन १९९२ च्या नियमावली नुसार व काही कंत्राटदार सन २०१५ च्या नियमावली नुसार नोंदणीकृत आहेत. अशा कंत्राटदारांना, कंत्राटदार नोंदणी नियमावली २०१६ च्या अमंलबजावणी नंतरही त्यांची मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटदार नोंदणी वैध असेपर्यंत मुंबई महानगरपालिकेच्या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. तद् नंतर अशा सर्व कंत्राटदारांना, कंत्राटदार नोंदणीबाबतची नियमावली सन २०१६ अन्वये नोंदणी करणे क्रमप्राप्त ठरेल. तसेच त्यांची विद्यमान नोंदणी वैधता संपण्याआधी देखील अशा कंत्राटदारांना सन २०१६च्या नियमावली नुसार नोंदणी करण्यास ऐच्छिक मुभा देण्यात आलेली आहे.

सन १९९२ च्या नियमावली नुसार नोंदणीकृत कंत्राटदार डिसें. २०१७ नंतर व सन २०१५ च्या नियमावली नुसार नोंदणीकृत कंत्राटदार डिसें. २०१९ नंतर पूर्णपणे रद्दबातल होतील. तद् नंतर केवळ सन २०१६ च्या नोंदणी नियमावली नुसार नोंदणीकृत कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येतील व कुठल्याही कंत्राटदाराने (स्थापत्य / यांत्रिकी व विद्युत) नवीन नियमावलीनुसार नोंदणी केलेली नसल्यास सदर कंत्राटदार महानगरपालिकेतील निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास पात्र ठरणार नाहीत.

पुढील अधिक माहितीसाठी महानगरपालिकेच्या http.://potal.mcgm.gov.in ह्या वेबसाईटवर निविदेमधील मॅन्युअलमध्ये पहावे.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| **नगर अभियंता** | **प्रमुख लेखापाल (वित्त)** | **संचालक (असे व प्र.)** |